ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 10 | ISSUE - 12 | AUGUST - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# देशभक्त संभाजीराव गरड व त्र्यंबक गुमते यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान



प्रा.भगत आर.एम.
एम. ए .बी. एड. नेट (इतिहास)
दे.सं. गरड महाविद्यालय, मोहोळ.

## प्रस्तावना-

भारत देश पारतंत्र्यात होता तेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महान नेत्यांनी, समाज सुधारकांनी प्रयत्न केले.त्यांनी समाजातील प्रत्येक स्तरामध्ये जाणीव जागृती घडवून आणली. यासाठी त्यांनी आंदोलने, सत्याग्रह ,चळवळी केल्या. या चळवळी भारतातील सर्व शहरे, खेडी, वाड्या,वस्त्यांपर्यंत पोहोचल्या.चळवळीमुळे प्रत्येक भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली. ब्रिटिशांविरुद्ध असंतोष प्रत्येकाच्या मनात निर्माण झाला. देश प्रेमाने या चळवळीमध्ये सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढत होती. सोलापूर जिल्ह्यात स्वातंत्र्यासाठी हालचाली चालू होत्या.त्यामध्ये मोहोळ शहर सुद्धा मागे नव्हते. मोहोळ शहरात सुद्धा या चळवळीचे पडसाद उमटले होते.मोहोळ मध्ये अनेक स्वतंत्र सैनिक आहेत. ज्यांनी या चळवळीमध्ये सहभाग घेतला व भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये खारीचा वाटा उचलला.परंतु आज या स्वतंत्र सैनिकांची माहिती कोणालाही नाही.आजची पिढी या सर्वांपासून खूप दूर आहे.त्या स्वतंत्र सैनिकांच्या घरातील व्यक्तींना सुद्धा त्यांची परिपूर्ण माहिती नाही. आपल्या परिसरातील अशा स्वतंत्र सैनिकांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे, पुन्हा एकदा त्यांच्या कार्याला उजाळा देणे, स्वातंत्र्य विषयक आठवणी जाग्या करणे हा या संशोधना पाठीमागचा मुख्य उद्देश आहे. देशभक्त संभाजीराव गरड व त्र्यंबक गुमते यांनी स्वातंत्र्य काळात महत्वपूर्ण कामगिरी केली होती. मोहोळ मधील सर्व जनतेला एकत्र घेऊन भारतीय स्वतंत्र लढा, सोलापूरचा मार्शल लॉ, हैदराबाद मुक्तिसंग्राम या महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांमध्ये त्यांनी केलेली कामगिरी मौल्यवान आहे.कारण त्या काळात ब्रिटिशांविरुद्ध एखादी साधे हालचाल सुद्धा खूप महाग पडत होती. मार्शल लॉ नुसार कोणालाही पकडणे, तुरुंगात टाकणे,मारणे यासारखी परिस्थिती असताना या स्वतंत्र सैनिकांनी लपून-छपून, भूमिगत राहून, जीवाची पर्वा न करता, भारत मातेसाठी, देश प्रेमापोटी केलेल्या कार्याची दखल घेणे गरजेचे आहे.

की वर्ड - मोहोळ, स्वातंत्र्यसैनिक, गुमते, गरड.

## उद्दिष्टे -

हा शोध निबंध खालील उद्देश समोर ठेवून केला आहे.

1. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मोहोळ शहरातील जनतेचा सहभाग जाणून घेणे.

2. मोहोळ शहरातील स्थानिक स्वातंत्र सैनिकांच्या योगदानाची जाणीव आजच्या पिढीला करून देणे.
3. त्र्यंबक घुमते यांचे स्वातंत्र लढ्यातील योगदान जाणून घेणे.
4. संभाजीराव गरड यांचे स्वातंत्र लढ्यातील योगदान जाणून घेणे.
5. स्थानिक स्वातंत्र सैनिकांचे योगदान प्रकाशात आणणे.

## संशोधन पद्धती व तंत्र -

हा संशोधन लेख तयार करण्यासाठी निरीक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे आणि मुलाखत व प्रश्नावली हे तंत्र वापरले आहे.

## देशभक्त संभाजीराव गरड यांचेभारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान -

देशभक्त संभाजीराव गरड यांचा जन्म 17 मे 1911 रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव रामचंद्र असे होते.त्यांना एक मुलगा व एक मुलगी होती. मुलाचे नाव रामकृष्ण व मुलीचे नाव ज्योती किरण असे होते. संभाजीराव गरड यांचे मुळगाव मोहोळ हे होते. सहा फूट उंच, धिप्पाड शरीरयष्टी असे भारदार व्यक्तिमत्व होते.ते कायम खादीचे कपडे वापरत असत. त्यांचे  शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले होते. त्यांचा मूळ व्यवसाय शेती हा होता. वडिलोपार्जित पाच एकर शेती होती. ते शेतात खूप कष्ट करत असत. शेतात विहिरी पाडून त्यांनी पाण्याची सोय केली होती. या शेतात ते भाजीपाला, ऊस,बागा  करत असत. तसेच शेतात त्यांची लिंबाची बाग होती.शेतातील माल ते स्वतः विकायला जात असत. कोणतेही काम कमी दर्जाचे समजत नसत. त्यांना बंदूक चालवायला येत होती. त्यांच्याकडे स्वतःची डबलबारची बंदूक होती. ती बंदूक आजही आहे. त्यांना उर्दू ,कन्नड, तेलगू, हिंदी इत्यादी भाषा अवगत होत्या. संभाजीराव प्रत्येक वेगळ्या भाषिक व्यक्तीशी त्या त्या भाषेतून संवाद साधत असत .उदाहरणार्थ उर्दू भाषिक व्यक्तीशी उर्दू भाषेतून पत्र लिहीत असत. जेणेकरून दिलेल्या संदेश फक्त त्या व्यक्तीलाच कळावा.

संभाजीराव गरड यांना मोहोळ परिसरात 'संभाजी महाराज' किंवा 'पर्णकुटीतील महाराज' म्हणून ओळखले जात होते. घरात त्यांना सर्वजण नाना म्हणून संबोधत असत. ते एका झोपडीत राहत होते ती झोपडी थोडी वेगळी होती. खाली विटांची भिंत तर वर कुड होते. या भिंतींना खालच्या बाजूला खिडक्या होत्या. त्यामुळे या खिडक्यातून हवा येत असे. तीनही ऋतूंमध्ये या झोपडीत त्रास होत नसे. म्हणूनच या झोपडीला पर्णकुटी असे म्हणत असत. संभाजीरावांचे पूर्ण आयुष्य या झोपडीतच गेले. त्यामुळे त्यांना पर्णकुटीतील महाराज असे संबोधले जाते. स्वातंत्र पूर्व व  स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक महत्त्वपूर्ण बैठका या झोपडीत झाल्या होत्या. संभाजीराव गरड यांच्यामध्ये सुरुवातीपासूनच कष्टाळूपणा, सहकार्य वृत्ती व संघटन कौशल्य होते.

सामाजिक  कार्य - विविध समाजातील गोरगरीब मुलं शिकली पाहिजेत असे त्यांना वाटत होते. ते गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणासाठी आपल्या घरी ठेवून घेत. त्यांच्या जेवणाची, राहण्याची सोय स्वतः करत, त्यांना गरिबांची ओढ होती. सर्वांना काम मिळावे यासाठी ते धडपड करत असत. अनेकांना त्यांनी नोकऱ्या मिळवून दिल्या. मोहोळमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. नागनाथ शाळा व गरड महाविद्यालय या शैक्षणिक संस्था स्थापन करताना त्यांनी मदत केली. पुढाकार घेतला. त्यांच्यासोबत सतत दहा-बारा तरी माणसे असत.आलेल्या प्रत्येकाला ते जेवण केल्याशिवाय जाऊ देत नसत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य - भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेऊन त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनाच्या विविध संघटनेमध्ये सहभागी होऊन ब्रिटिश सरकारविरुद्ध प्रचार केला. भाषणांद्वारे लोक जागृती केली. कार्यकर्त्यांची एक चांगली फळी त्यांनी निर्माण केली होती. 1941 च्या वैयक्तिक

सत्याग्रहांमध्ये भाग घेतल्याने त्यांना चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. सन 1942 च्या चलेजाव चळवळीत भाग घेतल्याने नऊ महिने सक्त मजुरी व शंभर रुपये दंडाची शिक्षा झाली होती. त्यातून त्यांच्या देशभक्तीची कल्पना येते. त्यांच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या कार्यातून स्वतःबरोबर मोहोळ तालुक्याचे ही नाव स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात कोरले गेले. स्वातंत्र्य आंदोलनातील कार्यामुळे ते देशभक्त संभाजीराव गरड म्हणून ओळखले जाऊ लागले. येरवडा येथील कारावासातून सुटून आल्यावर त्यांनी आईचा मार खाल्ला होता. तू किती खराब झाला आहेस म्हणून त्यांच्या आईने संभाजीरावांना मारले होते. ते कारावासात असताना कुटुंबाला खूप त्रास सहन करावा लागला होता. कारण घरातील कर्ता पुरुष संभाजीराव होते. या काळात त्यांना बाबुराव गरड यांनी मदत केली होती. या काळात सोलापूर मधील खंडाळी येथील खंडेराव , हिंगणे येथील जय हिंद व जगन्नाथ शिंदे ,मोहोळ मधील दत्तोबा गायकवाड आणि मुनी महाराज हे त्यांचे सहकारी होते.

### स्वातंत्र्योत्तर कार्य -

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संभाजीराव गरड यांनी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या राजकीय कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाने त्यांना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष केले. अध्यक्ष असताना त्यांनी अनेक विधायक कामे केली. महात्मा गांधीजींच्या निधनानंतर सोलापूर जिल्ह्यातून महात्मा गांधी स्मारक निधी जमा करण्याचे काम मंद गतीने सुरू होते. तेव्हा संभाजीराव गरड यांनी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना स्मारक निधी जमविण्यास मदत करावी व राष्ट्रपित्याचे ऋण फेडण्यासाठी कोणीही विसर पडू देऊ नये अशी विनंती केली. यातून मोठ्या प्रमाणावर स्मारक निधी जमा होण्यास मदत झाली. अध्यक्ष म्हणून कार्य करताना अनेक शेतकऱ्यांच्याष नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी सन 1948- 49 साली फक्त मोहोळ तालुक्यातील बारा हजार लोकांना काँग्रेसचे सभासद करून घेतले होते. अशा पद्धतीने त्यांनी मोहोळ तालुक्यातून काँग्रेस पक्षासाठी मोठे योगदान दिले होते.

दिवसभर शेतात काम व रात्रभर घरोघरी ,वाड्या- वस्त्यांवर जाऊन प्रचार करत असत. स्वतः इंदिरा गांधी, पंडित नेहरू संभाजीरावांना त्यांच्या नावाने ओळखत होते. सन १९८२ मध्ये जेव्हा आणीबाणीचा काळ होता तेव्हा इंदिरा गांधींनी एक दौरा काढला होता. त्यावेळी त्या कोल्हापूर- पंढरपूर -सोलापूर येथे आले असताना मोहोळ येथे थांबल्या होत्या. मोहोळ येथील नवोदय शाळेत इंदिरा गांधीजींची सभा झाली होती. त्या सभेमध्ये इंदिरा गांधीजींनी संभाजीरावांच्या नावाचा उल्लेख केला होता यावरून संभाजीरावांचे कार्य दिल्लीपर्यंत पोहोचल्याचे दिसून येते. सन 1954 ला पंडित नेहरू सुद्धा मोहळला आले होते, तेव्हा ते संभाजीरावांच्या घरी भेट देऊन गेले. यशवंतराव चव्हाण, शंकरराव मोहिते पाटील, शरदचंद्र पवार या दिग्गज व्यक्तींच्या बैठका सतत संभाजीरावांच्या झोपडीत होत असत .काँग्रेसचे सर्व नेते मंडळी संभाजीरावांना भेटल्याशिवाय जात नसत .शहाजीराव पाटील यांना राजकारणात येण्यासाठी संभाजीरावांनी खूप मदत केली.

राजकारण करत असताना त्यांनी समाज हिताच्या कामाला पाठिंबा दिला. समाज विघातक कामाला विरोध करताना कसलीही तडजोड त्यांनी केली नाही. मोहोळच्या राजकारणात पदाची अपेक्षा न करता शेवटपर्यंत सक्षम भूमिका निभावली. यामुळे तालुक्यात अनेक विकास कामे घडून शासकीय योजनांचा सर्वसामान्यांना फायदा झाला. कोळेगाव पाटी या ठिकाणी साखर कारखाना काढणे व त्याला नागनाथ साखर कारखाना हे नाव देण्याचे त्यांचे स्वप्न होते. सर्वसामान्यांसाठी काम करत असतानाच हडपसर जवळ अपघात होऊन संभाजीराव गरड यांचे 1984जून 30 रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने मोहोळ तालुक्याबरोबरच जिल्ह्याच्या राजकारणातही फार मोठी पोकळी निर्माण झाली.

## त्र्यंबक रूकबदास गुमते

गुमते हे मूळ बेळगावचे रहिवासी होते. परंतु उदरनिर्वाहासाठी ते मोहोळला आले होते. त्र्यंबक गुमते यांचा जन्म 1896 मध्ये झाला. पत्नीचे नाव नागरबाई होते. त्यांना तीन अपत्य होती .1930 मध्ये त्यांनी स्वतःचे भुसार मालाचे दुकान मोहोळ मध्ये चालू केले. या दुकानात गहू, ज्वारी, मका ,बाजरी व इतर धान्य मिळत असे. हा व्यवसाय करत असताना आपल्या शेतातील धान्य विकण्यासाठी परगावचे शेतकरी या आडतीच्या दुकानात येत असत. परगावच्या शेतकऱ्यांना संध्याकाळी उशीर झाल्यास परत जाता येत नसे. त्यामुळे ते मोहोळ मध्ये मुक्कामी राहत असत. अशा शेतकऱ्यांची त्यांच्या कुटुंबांची राहण्याची, जेवणाची सोय स्वतः स्वतंत्र सेनानी त्र्यंबक गुमते करत असत. पूर्वी धनगर समाजाची मोठी यात्रा भरत असे. यात्रेचा भंडारा गुमते यांच्या दुकानातूनघेतला जात असे.

मोहोळ तालुक्यात त्र्यंबक गुमते त्यांच्या स्वभावामुळे ,वक्तृत्वामुळे प्रसिद्ध होते. त्यांच्या लेखी शब्दाला खूप मान होता कोणत्याही गावात गेला तर तिथे तुम्हाला ओळखणारं एक तरी कुटुंब असावं असं त्यांचं मत होतं. म्हणजे माणसे जोडणं त्यांना खूप आवडायचं. धोतर ,कोल्हापुरी चप्पल, सदरा, जॅकेट, मखमली फेटा असा त्यांचा पेहराव होता. ते पूर्ण शाकाहारी होते. सर्व कुटुंबाला एकत्रित ठेवण्याचे कार्य त्यांनी केले होते. आपल्या सर्व मुलांमध्ये त्यांनी धार्मिक आवड निर्माण केली. विविध धार्मिक स्थळांना त्यांनी भेटी दिल्या होत्या. आजही त्यांचे कुटुंब त्यांना आदर्श मानते. लग्न करणे, तंटे मिटवणे अशा विविध स्वरूपात ते इतरांची मदत करत असत.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात जेव्हा महात्मा गांधी मोहोळला आले तेव्हा त्यांचे स्वागत गुमते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्र्यंबक गुमते यांचा मुलगा जीवंधर गुमते यांनी फरची टोपी घातली होती. ती त्र्यंबक गुमते यांनी काढली व परदेशी वस्तूंच्या होळीत टाकली. त्या क्षणापासून स्वतः त्र्यंबक गुमते यांनी स्वदेशीचा स्वीकार केला व आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत फक्त स्वदेशी वस्तूच वापरल्या. गुमते यांच्या सांगण्यावरून डॉक्टर राजेंद्र प्रसाद ही मोहोळ मध्ये आले होते. 1930 च्या चळवळीत सोलापूर शहरातून येणारे भूमिगत व निर्वासितांना त्यांनी आश्रय दिला होता. 1948- 49 मध्ये निजामशाहीतून (कर्नाटकातून) कोल्हापूर मार्गे आलेले काही निर्वासित ,भूमीगत, स्वातंत्र्य सैनिक यांना दोन महिने स्वतःच्या शेतात आश्रय दिला. त्यांच्या राहण्याची जेवणाची सोय केली.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी किराणा व खाद्य तेलाचा व्यवसाय सुरू केला .मोहोळ येथील नागनाथ मंदिराचे सेक्रेटरी होते. त्यांच्या काळात मंदिराचा नगारखाना कर्नाटकातील कुरुंदाचा दगड वापरून बांधण्यात आला .सरकारने त्यांना देऊ केलेली पेन्शन, बक्षीस किंवा सन्मान त्यांनी स्वीकारले नाहीत. स्वयंस्फूर्तीने त्यांनी आपल्याला गरज नाही आपले आर्थिक परिस्थिती चांगली आहे म्हणून त्यांनी पेन्शन नाकारली. त्यांना एक शिस्त होती ती म्हणजे प्रत्येक वस्तू ज्या कामासाठी आणले आहे त्याच कामासाठी वापरली जावी. यासाठी ते त्या वस्तूंवर स्वतःचे नाव, वस्तूचा नंबर व ती वस्तू कशासाठी आहे ते लिहून ठेवत. उदाहरणार्थ बाजारची पिशवी असेल तर ते त्यावर बाजारचे पिशवी असे नाव लिहित स्वतःचे नाव व बाजारच्या पिशवी चा नंबर लिहीत असत. त्यांच्या अनेक वस्तू आजही पाहायला मिळतात .त्यामध्ये कुपन, पिशवी, पाठ काठी इत्यादींचा समावेश होतो .आजही त्यांच्या या वस्तू त्यांचे नातू ,पणतू व कोणते परिवाराने जपून ठेवले आहेत. असे हे त्र्यंबक गुमते मोहोळ तालुक्यातील एक आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांचे चुलत भाऊ अनंत राज गुमते हे त्यांचे सहकारी होते.

## सारांश -

मोहोळ शहरातील स्वतंत्र सेनानी त्र्यंबक गुमते आणि देशभक्त संभाजीराव गरड यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला होता. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील चळवळींमध्ये त्यांचे योगदान आहे. त्यांनी देशप्रेमाने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, अनेक वर्ष लपून-छपून, भूमिगत राहून स्वातंत्र्याचे कार्य केले. 1930 चा सोलापूर शहरातील मार्शल

लॉ मधील सहभाग, 1941 चा वैयक्तिक सत्याग्रह, 1942 चा चले जाव चळवळ, हैदराबाद मुक्तिसंग्राम या व अशा स्वतंत्र चळवळीमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये त्यांनी कारावास भोगून दंड भरून इंग्रजांचा त्रास सहन करूनही देशसेवा सोडली नाही. असहकार चळवळीत भाग घेतला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरही त्यांनी केलेले कार्य खूप महत्त्वपूर्ण आहे. स्वतंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून गरड यांनी मोहोळ शहराच्या विकासात मोलाची भर घातली. गरिबांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. सर्वांना काम मिळावे यासाठी ते धडपडत होते. स्वातंत्र्यानंतरही समाजऋण म्हणून ते समाजसेवा करत राहिले. मोहोळ मधील पाणी शिक्षण यासारख्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

## निष्कर्ष -

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोहोळ शहराचे यांचे योगदान महत्त्वाचे आहे.
2. त्र्यंबक गुमते यांनी दिलेले स्वातंत्र्य लढ्यातील योगदान आजही प्रेरणादायी आहे.
3. शिक्षा झाली, तुरुंगवास झाला तरीही त्यांनी देशी सेवा सोडली नाही यावरून त्यांची देशभक्ती समजते.
4. देशभक्त संभाजीराव गरड यांनी दिलेले स्वतंत्र लढ्यातील योगदान आज ही स्फूर्ती देते.
5. देशभक्त संभाजीराव गरड व त्र्यंबक गुमते यांच्या कार्यातून आजच्या तरुण पिढीला प्रेरणा मिळते.

## संदर्भ ग्रंथ सूची -


1. स्वातंत्र्य सैनिकांचा चरित्रकोष खंड एक - डॉ.भ. ग. कुंटे
2. मोहोळ तालुका एक ऐतिहासिक अभ्यास - डॉक्टर एस. पवार
3. सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र - डॉ. प्रदीप आगलावे